आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार, दिनांक २२ ऑगस्ट २०२४

ठळक बातम्या

1. बदलापूरमधल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाकडून दखल; पुढील सुनावणी २७ ऑगस्ट रोजी.
2. दिनांक २५ ऑगस्ट रोजी नियोजित महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ पुढे ढकलण्याचा आयोगाचा निर्णय.
3. ॲग्रोव्हिजन फॉउंडेशन द्वारे उभारल्या जाणाऱ्या शेतकरी प्रशिक्षण केंद्राचा भूमिपूजन सोहळा गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते २५ ऑगस्ट रोजी होणार संपन्न.
4. स्वच्छ नागपूर साकारण्यासाठी "आत्मनिर्भर वार्ड" संकल्पनेची 1 सप्टेंबरपासून होणार अंमलबजावणी.

****

बदलापूर सुनावणी

बदलापूरमधल्या शाळेत लहान मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराची मुंबई उच्च न्यायालयानं स्वतः दखल घेतली आहे. याप्रकरणी आज झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयानं बदलापूर पोलिसांना फटकारलं आहे. लैंगिक अत्याचार झाला आहे याची माहिती मिळताच पोलिसांनी गुन्हा दाखल करायला हवा होता. मात्र बदलापूर मधल्या जनक्षोभा नंतरच पोलिसांनी कारवाई केली असं न्यायालयानं म्हटलं आहे. बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणात गुन्हा लपवल्याप्रकरणी संबंधित शाळेवर कारवाई करणार असल्याची माहिती राज्य सरकारतर्फे उच्च न्यायालयात देण्यात आली. या प्रकरणाची पुढील सुनावणी २७ ऑगस्टला दुपारी अडीच वाजता होणार आहे.

बदलापूर/विद्यार्थी सुरक्षा

महाराष्ट्रात बदलापूर आणि घाटकोपरमध्ये, शालेय विद्यार्थ्यांवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना लागू करण्याबाबतचा शासन निर्णय, काल जारी करण्यात आला. त्यानुसार सर्व शाळांसाठी येत्या एक महिन्यात, मोक्याच्या ठिकाणी पुरेशा संख्येनं,

सीसीटीव्ही कॅमेरे बसवणं बंधनकारक राहील. कंत्राटी पद्धतीनं कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना शाळांना अत्यंत दक्ष राहण्याचे आणि, योग्य प्रक्रियेनंतर पोलिसांकडून त्यांची पडताळणी करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसंच विशाखा मार्गदर्शक तत्त्वांच्या धर्तीवर शाळांनी आठवडाभरात, 'विद्यार्थी सुरक्षा समित्या' स्थापन करायच्या आहेत. दरम्यान, अकोला जिल्ह्यातल्या केवळ ४० टक्के खासगी शाळा वगळता, इतर मंडळांच्या कोणत्याही शाळेत, सीसीटीव्ही कॅमेरे बसवले नसल्याचं, निदर्शनास आलं आहे. जिल्ह्यातल्या काझीखेड इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेतल्या सहा विद्यार्थिनींना अश्लील व्हिडीओ दाखवून त्यांचा लैंगिक छळ झाल्याचं उघडकीला आलं आहे.

'राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार'

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात आयोजित कार्यक्रमात, देशातल्या नामवंत शास्त्रज्ञांना, २०२४ सालचे, 'राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार' प्रदान केले. प्रा.गोविंदराजन पद्मनाभन यांना यावेळी 'विज्ञानरत्न-२०२४' पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. डॉ.आनंद रामकृष्णन यांना कृषी विज्ञान क्षेत्राचा विज्ञान-श्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबईतल्या भाभा अणु संशोधन केंद्रातले डॉ.आवेश कुमार त्यागी यांना, अणुऊर्जा क्षेत्रातल्या, विज्ञान-श्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. पुण्यामधल्या भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेतले, प्रा.जयंत उदगावकर यांना राष्ट्रपतींच्या हस्ते, जीवशास्त्रातला विज्ञान-श्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. कृषी विज्ञान क्षेत्रात विशेष योगदानाकरिता यवतमाळचे डॉ.यशवंत गोटे यांना राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार प्रदान करण्यात आला असून, अकोल्यातील प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.प्रशांत मंगले यांना सुद्धा राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार प्राप्त झाला आहे.

एमपीएससी

दिनांक २५ ऑगस्ट रोजी नियोजित, महाराष्ट्र राजपत्रित, नागरी सेवा संयुक्त, पूर्व परीक्षा-२०२४ पुढे ढकलण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. परीक्षेची नवी तारीख लवकरचं जाहीर करण्यात येईल असं आयोगानं समाज माध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. राज्यसेवा परीक्षा २५ ऑगस्ट रोजी घेण्यात येणार होती. परंतु त्याच दिवशी, 'आयबीपीएस'ची देखील परीक्षा असल्यामुळे या दोन्ही परीक्षा, एकाच दिवशी आल्यामुळ अनेक उमेदवारांना कोणत्या तरी एका परीक्षेवर पाणी सोडावं

लागणार होतं. यासंदर्भात विद्यार्थी आणि लोक प्रतिनिधींकडून आयोगाकडे पाठपुरावा करण्यात येत होता.

जागतिक लोकसाहित्य दिन

दरवर्षी २२ ऑगस्ट रोजी जागतिक लोकसाहित्य दिन साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय लोकसाहित्य समितीनं १९९१ मध्ये हा दिवस जागतिक स्तरावर साजरा करायला सुरवात केली. लोक-कथन परंपरा मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा अविभाज्य घटक आहे. आजच्या 'जागतिक लोकसाहित्य दिना'निमित्त, सायंकाळी भारत सरकाराच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं, दक्षिण-मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर इथ आज, महाराष्ट्राच्या लोककलेचा अविभाज्य भाग असलेल्या कथाकथन परंपरेवर प्रकाश टाकणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम नागपूर इथल्या सांस्कृतिक केंद्र, परिसरात सुरु आहे. यात पोवाडा, गोंधळ, भारुड आदी लोककथांचे सादरीकरण होणार आहे.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी, नागपूर

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी, नागपूरद्वारा नवीन पदोन्नती प्राप्त सहाय्यक आयकर आयुक्तांसाठी आयोजित, सात आठवड्यांचा अभिमुखता कार्यक्रम “उत्तरायण-२०२४” नुकताच पूर्ण झाला. या कार्यक्रमाचा निरोप समारंभ, उद्या दिनांक २३ ऑगस्ट रोजी सकाळी सव्वा-अकरा वाजता आयोजित करण्यात आला असून, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूरचे कुलगुरू, प्रा.डॉ.विजेंदर कुमार प्रमुख पाहुणे या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

आचार्य देवव्रत, पुस्तक

ॲग्रोव्हिजन फाऊंडेशन प्रसिद्ध कृषीतज्ज्ञ तसंच गुजरातचे राज्यपाल, आचार्य देवव्रत यांनी लिहिलेल्या नैसर्गिक शेतीवरील हिंदी पुस्तक, "प्राकृतिक खेती"च्या मराठी आवृत्तीचं प्रकाशन सोहळा, येत्या २५ ऑगस्ट रोजी सकाळी अकरा वाजता डॉ.वसंतराव देशपांडे स्मृती सभागृह, नागपूर इथं आयोजित करण्यात आला आहे. आचार्य देवव्रत, नैसर्गिक शेती पद्धतीचा प्रचार करण्याच्या त्यांच्या व्यापक कार्यासाठी ओळखले जातात. त्यांनी हे पुस्तक पर्यावरणास अनुकूल आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य अशा, नैसर्गिक शेतीचं ज्ञान आणि तंत्र, शेतकऱ्यांना समजावं यासाठी लिहिलं आहे. त्याचप्रमाणे २५ ऑगस्ट रोजी, ॲग्रोव्हिजन फाउंडेशनतर्फे वर्धा रोडवरील त्यांच्या शेतकरी प्रशिक्षण केंद्राचा भूमिपूजन सोहळा, देवव्रत यांच्या हस्ते पार पडणार आहे. वर्षभर शेतकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळण्याची सोय व्हावी याकरिता, ऍग्रोव्हिजन

फॉउंडेशनद्वारे हे प्रशिक्षण केंद्र उभारलं जात आहे. या केंद्रात ५०० लोकांच्या क्षमतेचं सभागृह, १०० लोकांच्या क्षमतेचा कॉन्फरन्स हॉल तसंच प्रशिक्षण हॉल, आणि एकंदर ४५,००० चौरस फूट परिसरात सहा मजली इमारतीत कापूस चाचणी आणि माती परीक्षण प्रयोगशाळा, थेट शेतकरी ते ग्राहक विक्रीसाठी छोटी बाजारपेठ आणि इतर सुविधा असतील. प्रशिक्षण, कार्यशाळा आणि प्रात्यक्षिकांद्वारे शेतकरी समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी, ऍग्रोव्हिजन फॉउंडेशनचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र हे एकमेव ठिकाण असेल.

आत्मनिर्भर वार्ड

स्वच्छ, सुंदर आणि स्वस्थ नागपूर साकारण्यासाठी, नागपूर मनपाच्यावतीनं एक सप्टेंबरपासून “आत्मनिर्भर वार्ड” संकल्पना राबविण्यात येणार असून, याद्वारे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीनं शहराला स्वच्छ, सुंदर आणि स्वस्थ साकारण्यासाठी पुढाकार घ्यावा असं आवाहन मनपाद्वारे करण्यात आलं आहे. वार्ड सीमेच्या आत शंभर टक्के ओला कचऱ्यावर प्रकिया आणि शंभर टक्के सुका कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात असे ‘आत्मनिर्भर वार्ड’ निर्माण करण्यात येत असल्याचं, घनकचरा विभाग प्रमुख डॉ.गजेंद्र महल्ले यांनी सांगितलं. या अंतर्गत वार्डमध्ये शून्य कचरा कार्यक्रम राबविण, ओला आणि सुका कचऱ्याचं योग्य वर्गीकरण करण, ओल्या कचऱ्याचं कॅपोस्टिंग करण, आदी उपक्रम घेण्यात येणार आहेत. याकरिता आत्मनिर्भर वार्ड म्हणून प्रत्येक झोनमधील एका प्रभागाची निवड करण्यात आली आहे. बी.डब्ल्यु.जी./आर.डब्ल्यु.ए तसंच स्वयंसेवी संस्थाचा स्वावलंबी वार्ड समितीत सहभाग असेल. निर्माण होणाऱ्या कचऱ्याची त्याच वार्डमध्ये विल्हेवाट लावण्याकरिता डी-सेंट्रलाईज प्रोसेसिंग युनिट बसविण्यात येणार आहे.

झोनल मीटिंग आकाशवाणी

उद्या दिनांक २३ ऑगस्ट रोजी, आकाशवाणीच्या क्षेत्रीय कार्यक्रम समन्वय समितीची बैठक, हॉटेल हेरिटेज-१, सिव्हील लाईन्स, नागपूर इथं आयोजित करण्यात आली आहे. आकाशवाणी नागपूरद्वारा आयोजित, या बैठकीचं उदघाटन, उद्या सकाळी साडेनऊ वाजता, पश्चिम क्षेत्राचे अपर महानिदेशक-कन्टेन्ट विश्वनाथ कंबलियाल यांच्या हस्ते होईल. महाराष्ट्रातील सर्व आकाशवाणी केंद्रांचे कार्यक्रम प्रमुख या बैठकीस उपस्थित राहणार असून, ऑक्टोबर २०२४ ते मार्च २०२५ पर्यंतच्या आकाशवाणी कार्यक्रमांचं नियोजन या बैठकीत करण्यात येणार आहे.

नविन फौजदारी कायदे

भारतात एक जुलै २०२४ पासून नविन फौजदारी कायदे लागू झाले. या अनुषंगानं केन्द्रीय संचार ब्यूरो, नागपूर तसंच, जिला विधि सेवा प्राधिकरण आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानं उद्या आणि परवा डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधि महाविद्यालय, इथं मल्टिमीडिया चित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. "नविन फौजदारी कायदे" विषयांवर आधारीत या प्रदर्शनाचं उद्घाटन उद्या सकाळी दहा वाजता होणार आहे.

हवामान

आगामी काही तासांत विदर्भाच्या, काही भागांत विजांच्या कडकडाटासह, वादळ आणि काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असून, येत्या २६ तारखेपर्यंत, सतर्कतेचा येलो अलर्ट हवामान खात्यानं जारी केला आहे. तर परवा २४ तारखेला, अमरावती, वर्धा, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

आकाशवाणी संगीत चाचणी

विविध संगीत प्रकारा अंतर्गत हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत, लोकसंगीत आणि सुगम संगीताच्या कलाकारांसाठी आकाशवाणी स्वरपरीक्षण-२०२४ साठीची प्रक्रिया सुरु झालेली आहे. ज्या संगीत कलाकारांना स्वर परीक्षणासाठी अर्ज करायचा असेल, त्यानी **mas.prasarbharati.org** या वेबसाईटवर जाऊन आपला अर्ज ऑनलाईन पध्दतीनं भरावा. अर्ज करण्यासाठी अंतिम तारीख **21** सप्टेंबर ही आहे.

नाना पटोले

महायुती सरकारनं भ्रष्टाचाराचा कळस गाठला असून, महाराष्ट्राच्या डोक्यावर कर्ज लादून महागाई वाढवली आहे असा आरोप करत, महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी भाजप युती सरकार उखडून फेका असं आवाहन, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष, नाना पटोले यांनी केलं. उत्तर महाराष्ट्र विभागातील नंदरूबार, धुळे, जळगाव जिल्ह्यातील आढावा बैठक, नंदूरबारमध्ये पार पडली, त्यावेळी पटोले बोलत होते. दरम्यान, येत्या २४ ऑगस्ट रोजी महाविकास आघाडीनं, महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. यामागे कोणतंही राजकारण नसून, महिला भगिनी सुरक्षित राहाव्यात यासाठी बंद पुकारण्यात आल्याचं, माजी मुख्यमंत्री, उद्धव ठाकरे यांनी आज स्पष्ट केलं. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते.

*****